Pc/5/D/Affiliation/Circular/sujay

# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

**क्र. संलग्नता/आयसीसी/(२०२५–२६)/१८/२०२५**

**विषय: उच्च शिक्षण विभागाच्या विद्यापीठांची व महाविद्यालयांची डॅशबोर्ड माहिती भरणेबाबत....**

संदर्भ: १) मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मंगळवार दिनांक १५/०७/२०२५ मधील बैठकीत दिलेली सूचना.

२) प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१६ यांचे क्र. उशिसं/AISHE/2024-25/2025/E-1957018, दिनांक २२/०७/२०२५ रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मुंबई विद्यापीठ संलग्नित/स्वायत्त महाविद्यालयांचे संचालक/प्राचार्य यांना उक्त संदर्भान्वये कळविण्यात येते की, उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या अकृषी विद्यापीठांची, संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांची माहिती विकसित केलेल्या डॅशबोर्ड पोर्टलमध्ये विद्यापीठांमार्फत माहिती भरणे अनिवार्य करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठ संलग्नित असलेल्या महाविद्यालयांनी पोर्टलमध्ये उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये प्रवेश, संलग्नता व परिक्षा विभाग व परिक्षेचे वेळापत्रक तसेच निकाल इत्यादी बाबतची आवश्यक माहिती व त्यातील सुधारणा Whatsup Group द्वारे तसेच EY कंपनीमार्फत पाठविलेल्या ई–मेल द्वारे कळविण्यात आल्या आहेत. त्या सुधारणांसहीत आवश्यक अचूक माहिती दिनांक २४/०७/२०२५ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

तसेच वरील आवश्यक माहिती पाठवितांना ज्या काही ERROR अथवा काही अडचणी EY येत असेल तर टिम यांचेशी संपर्क साधून त्या अडचणी सोडवाव्यात.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.

मुंबई–४०० ०३२
दिनांक २३ जुलै, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.

N-STAT011/1/2024-STATS-Part(2) I/1337387/2025

VC/F(?)/2025-26/603


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालनाय (उच्च शिक्षण)

412,ई,बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,

शिवाजीनगर,पुणे-411 001

संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in

stat.dhepune@nic.in ☎ 020-29707093


क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE/ 2024-25/2025/E-1957018 दिनांक- /07/2025

प्रति,

कुलसचिव,सर्व सार्वजनिक विद्यापीठे

Supt/HC 24/07/25

विषय:-उच्च शिक्षण विभागाच्या विद्यापीठांची व महाविद्यालयांची डॅशबोर्ड पोर्टलमध्ये माहिती भरणेबाबत...

संदर्भ:- मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी मंगळवार दिनांक-15/07/2025 मधील बैठकीत दिलेली सूचना

उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या अकृषी विद्यापीठांची,संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांची माहिती विकसित केलेल्या डॅशबोर्ड पोर्टलमध्ये विद्यापीठांमार्फत माहिती भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यापीठांनी तसेच महाविद्यालयांनी डॅशबोर्ड पोर्टलमध्ये प्रवेश,संलग्नता व परिक्षा विभाग व परिक्षेचे वेळापत्रक तसेच निकाल इत्यादी आवश्यक माहिती API (Application Programming Interface) द्वारे दिनांक-05/03/2025 पर्यंत भरणे आवश्यक होते होते. परंतू बहुतांश विद्यापीठांनी सदरची माहिती डॅशबोर्ड मध्ये अद्यापही सादर केलेली नाही.तसेच सादर केलेली माहीती अपुर्ण स्वरूपात देण्यात देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी मंगळवार दिनांक-15/07/2025 रोजी डॅशबोर्ड पोर्टलबाबतची आढावा बैठक घेण्यात आली असून डॅशबोर्ड पोर्टल मध्ये सर्व सार्वजनिक विद्यापीठांनी व तसेच त्यांचेशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांची पोर्टलमध्ये उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात मध्ये प्रवेश,संलग्नता व परिक्षा विभाग व परिक्षेचे वेळापत्रक तसेच निकाल इत्यादी आवश्यक माहिती व त्यातील सुधारणा Whatsup Group द्वारे तसेच EY कंपनीमार्फत पाठविलेल्या ई-मेलद्वारे कळविण्यात आल्या आहेत. त्या सुधारणांसहीत आवश्यक अचूक माहिती दिनांक-24/07/2025 पर्यंत पुर्ण करण्यात यावी.तसेच आपल्या विद्यापीठांची माहिती डॅशबोर्ड पोर्टलवर बरोबर आहे किंवा कसे याची खात्री दिनांक-24/07/2025 पर्यंत करण्यात यावी.

वरील आवश्यक माहिती पाठविताना ज्या काही ERROR अथवा अडचणी येत असेल तर EY टिम यांचेशी संपर्क साधून त्या ERROR अथवा अडचणी सोडविण्यात याव्यात तसेच संबंधितांनी अचूक माहिती सादर करण्याबाबतची कार्यवाही करावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 22-07-2025 17:23:30

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )
संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे

R + DBOEE + DICT + DR-AEM + DR-CAP

VC

23 JUL 2025

प्रत-माहितीस्तव सविनय सादर-

मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई

प्रत-माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी-

1. EY कंपनी, मुंबई
2. प्रतिनिधी-महा आयटी,मुंबई

प्रत-

1. कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
2. स्वामी, रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
3. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
4. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.
6. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.
7. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक,जि.नागपुर
8. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई
9. मुंबई विद्यापीठ,मुंबई
10. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.
11. गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
12. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर
13. गोखले अर्थशास्त्र संस्था,डेक्कन जिमखाना,पुणे
14. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,गुलटेकडी,पुणे
15. डेक्कन अभिमत विद्यापीठ,येरवडा,पुणे
16. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी / कायदा विद्यापीठ,मुंबई.
17. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी / कायदा विद्यापीठ,नागपूर.
18. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी / कायदा विद्यापीठ,औरंगाबाद.
19. डॉ. होमी भाभा स्टेट युनिर्व्हसिटी,मुंबई
20. हैद्राबाद सिंध नॅशनल कोलगेट युनिर्व्हसिटी,मुंबई.
21. कर्मवीर भाऊराव पाटील युनिर्व्हसिटी, सातारा.
22. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक